July-2023

# बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार प्रयत्न करणे गरजेचे

## आ.अरुण लाड : क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालय रौप्यमहोत्सवी वर्धापनदिन

**वार्ताहर**
कुंडल

शासनाचे शैक्षणिक धोरण बदलत असल्याने आपण बदलत्या धोरणानुसार स्पर्धेत टिकण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे मत आ. अरुण लाड यांनी केले. ते क्रांतिअग्रणी डा. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे माजी संचालक किरण लाड, जेष्ठ विचारवंत व्ही.वाय पाटील, गांधी एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, खजिनदार गोविंदराव डुबल आदी उपस्थित होते.

आ. लाड पुढे म्हणाले, शासनाच्या बदलत्या शैक्षणिक धोरणाचा सर्वात जास्त फटका ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषता मुलींना बसणार असल्याने ग्रामीण भागातील मुला, मुलींसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध्द करुन देण्यासाठी एकत्रीत प्रयत्नांची गरज आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. विद्यार्थी, पालक आकर्षित होण्यासाठी पायुभूत सुविधाबरोबरच उच्च दर्जाचे शिक्षण देणे गरजेचे असून कोणतीही गोष्ट मिळविणे सोपे असते, मात्र ते टिकवणे अवघड असल्याने सर्वांनी कोणतीही गोष्ट मिळविण्यासाठी जेवढे प्रयत्न करतो तेवढेच कष्ट ते टीकविण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे असल्याचे शेवटी सांगितले.



कुंडल : येथील क्रांतिअग्रणी डॉ.जी.डी.बापू लाड महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमामध्ये बोलताना आमदार अरुण (अण्णा) लाड सोबत इतर मान्यवर.

किरण लाड म्हणाले, जगाच्या स्पर्धेत ग्रामीण भागातील मुले टीकली पाहिजेत यासाठी पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध्द करुन देण्याच्या उद्देशाने स्व. क्रांतीअग्रणी जी. डी. बापूंच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय सुरु केले. प्रारंभी फक्त कला शाखेवर सुरु झालेल्या महाविद्यालयात आज वाणिज्य, सायन्स याबरोबरच बी.सी.ए. हे विभाग ही सुरु झाले आहेत.

व्ही.वाय.पाटील म्हणाले स्पर्धेच्या जगात जगायच अन टिकायचे असेल तर नविन कौशल्य संपादन केले पाहिजे याची जाणिव आजच्या युवा पिढीला झाल्याने अलीकडील स्पर्धा परीक्षेमध्ये ग्रामिण मुले ही यशस्वी होत असलेचे आशादायी चित्र आहे. माजी प्राचार्य प्रा.डा? प्रताप लाड यांनी आपल्या मनोगतामध्ये महाविद्यालयाच्या उभारणीपासून च्या गत आठवणींना उजाळा दिला

यावेळी महाविद्यालयाच्या प्रतिबिंब या वार्षिक अंकाचे प्रकाशन ही करण्यात आले. प्रास्ताविक प्राचार्य डा. आर. एस. डुबल यांनी केले सुत्रसंचलन प्रा. डॉ. धनंजय होनमाने यांनी तर आभार प्रा.डॉ. नवनाथ गुंड यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक संभाजी लाड, डा. व्ही. डी. पाटील, एम. टी. हुबाले, शिवाजी गावडे, दिलीप लाड, अशोक लाड, ग्रामीण कथाकार जयवंत आवटे, संवाद मंचचे अध्यक्ष अशोक पवार, प्रतिनिधी हायस्कूलचे प्रशासन प्रमुख शिवाजी लाड प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी आदी मान्यवर उपस्थित होते.

दै. तरुण भारत
दि. १२/०७/2023



**कुंडल :** डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयात बोलताना अरुण लाड, किरण लाड, व्ही. वाय. पाटील, चंद्रकांत रोकडे, प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल आदी.

# बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार स्पर्धेमध्ये टिकण्यास प्रयत्न करा

## अरुण लाड ; डॉ. लाड महाविद्यालयात वर्धापन दिन

कुंडल, ता. १३ : शैक्षणिक धोरण बदलत असल्याने स्पर्धेत टिकण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत आमदार अरुण लाड यांनी केले. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होते. जिल्हा बँकेचे माजी संचालक किरण लाड, व्ही. वाय. पाटील उपस्थित होते.

आमदार लाड म्हणाले, ''बदलत्या शैक्षणिक धोरणाचा सर्वात जास्त फटका ग्रामिण विद्यार्थ्यांना, मुलींना बसणार असल्याने शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी प्रयत्नांची गरज आहे. पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रम सुरु केल्यास फायदा होईल. विद्यार्थी, पालक आकर्षित होण्यासाठी पायाभूत सुविधांबरोबरच उच्च दर्जाचे शिक्षण देणे गरजेचे आहे.''

किरण लाड म्हणाले, ''ग्रामिण मुले स्पर्धेत टिकली पाहिजेत. त्यांना संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने क्रांतीअग्रणी जी. डी. बापूंच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय सुरू केले. कला, वाणिज्य, शास्त्र व बी. सी. ए. विभाग सुरु आहेत.''

इथून पुढे व्यावसायिक शिक्षणाची गरज आहे, असे व्ही. वाय. पाटील, डॉ. प्रताप लाड यांनीही मनोगतात सांगितले.

प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी प्रास्ताविक केले. डॉ. धनंजय होनमाने यांनी सुत्रसंचालन केले. डॉ. नवनाथ गुंड यांनी आभार मानले. संस्थेचे उपाध्यक्ष प्रा. चंद्रकांत रोकडे, गोविंद डुबल, संचालक संभाजी लाड, डॉ. व्ही. डी. पाटील, एस. टी. हुबाले, शिवाजी गावडे, दिलीप लाड, अशोक लाड, ग्रामिण कथाकार जयवंत आवटे, अशोक पवार, प्रतिनिधी हायस्कूलचे प्रशासन प्रमुख शिवाजी लाड, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

दै. सकाळ
दि १४/०४/2023

# बदलत्या शैक्षणिक धोरणानुसार स्पर्धेत टिकण्यासाठी प्रयत्न करा

## आ. अरुण लाड; डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाचा रौप्यमहोत्सव उत्साहात

**केसरी वृत्तसेवा**

**कुंडल :** शासनाचे शैक्षणिक धोरण बदलत असल्याने आपण बदलत्या धोरणानुसार स्पर्धेत टिकण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे मत आमदार अरुण लाड यांनी व्यक्त केले.

क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवीवर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी जिल्हा बँकेचे माजी संचालक किरण लाड, ज्येष्ठ विचारवंत व्ही. वाय. पाटील, गांधी एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष चंद्रकांत रोकडे, खजिनदार गोविंदराव डुबल आदी मान्यवर उपस्थित होते.

आ. लाड म्हणाले, शासनाच्या बदलत्या शैक्षणिक धोरणाचा सर्वात जास्त फटका ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना विशेषतः मुलींना बसणार आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील मुला-मुलींसाठी शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संघटित प्रयत्नांची गरज आहे. पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक अभ्यासक्रम सुरू केल्यास ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना त्याचा फायदा होईल. विद्यार्थी, पालक आकर्षित होण्यासाठी पायाभूत सुविधांबरोबरच उच्च दर्जाचे शिक्षण देणे गरजेचे आहे.



**कुंडल : क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या रौप्यमहोत्सवी वर्धापनदिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलताना आमदार अरुण लाड. सोबत किरण लाड, व्ही.वाय. पाटील आदी.**

किरण लाड म्हणाले, ग्रामीण भागातील मुले जागतिक स्पर्धेत टिकली पाहिजेत यासाठी पारंपरिक शिक्षणाबरोबरच व्यावसायिक शिक्षणाची संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने स्व. क्रांतिअग्रणी जी. डी. बापूंच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालय सुरू केले. प्रारंभी फक्त कला शाखेवर सुरू झालेल्या महाविद्यालयात आज वाणिज्य, सायन्स याबरोबरच बी. सी. ए. हे विभागही सुरू झाले आहेत.

व्ही. वाय. पाटील म्हणाले, स्पर्धेच्या जगात जगायचे आणि टिकायचे असेल तर नवीन कौशल्य संपादन केले पाहिजे याची जाणीव आजच्या युवा पिढीला झाल्याने अलीकडील स्पर्धा परीक्षांमध्ये ग्रामीण मुलेही यशस्वी होत असल्याचे आशादायी चित्र आहे.

माजी प्राचार्य प्रा. डॉ. प्रताप लाड यांनी महाविद्यालयाच्या उभारणीपासूनच्या आठवणींना उजाळा दिला. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालयात ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी महाविद्यालयाच्या 'प्रतिबिंब' या वार्षिक अंकाचे प्रकाशनही झाले. प्रास्ताविक प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल यांनी केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. धनंजय होनमाने यांनी केले. आभार प्रा. डॉ. नवनाथ गुंड यांनी मानले.

या कार्यक्रमासाठी संस्थेचे संचालक संभाजी लाड, डॉ. व्ही. डी. पाटील, एम. टी. हुबाले, शिवाजी गावडे, दिलीप लाड, अशोक लाड, ग्रामीण कथाकार जयवंत आवटे, संवाद मंचचे अध्यक्ष अशोक पवार, प्रतिनिधी हायस्कूलचे प्रशासन प्रमुख शिवाजी लाड, प्राध्यापक, कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

दै. केसरी

दि. १४/०५/2023



**कुंडल :** क्रांतिअग्रणी महाविद्यालय, पलूस तालुका राष्ट्रवादी युवक संघटना, प्रतिनिधी विद्या संकुल यांच्या संयुक्त विद्यमाने मणिपूर राज्यातील महिलांवरील अत्याचारप्रकरणी 'एक सही संतापाची' आंदोलन केले.

# कुंडलला मणिपूर घटनेचा निषेध

**कुंडल, ता. २९ :** मणिपूर येथे झालेल्या महिलांवरील अत्याचाराच्या घटनेचा निषेध करण्यात आला. क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाची राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना (पलूस तालुका), प्रतिनिधी ज्युनिअर कॉलेज यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक सही संतापाची' आंदोलनाने निषेध केला.

सर्जेराव खरात म्हणाले, ''मेमध्ये मणिपूरमध्ये दोन जमातीमधील असंतोषाचे पर्यवसान महिलांवरील अत्याचारामध्ये होत आहे. या अन्याय-अत्याचाराविरुद्ध आता महिलांसह जनतेतूनच उठाव होणे आवश्यक आहे.'' धनंजय होनमाने यांनीही या घटनेचा निषेध केला.

याप्रसंगी गांधी एज्युकेशन सोसायटीचे पदाधिकारी, राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे पलूस तालुकाध्यक्ष संदीप मुळीक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल, प्रतिनिधी विद्या संकुलाचे मुख्याध्यापक चंद्रकांत जाधव, राष्ट्रीय सेवा योजनेचे समन्वयक प्रा. धनंजय होनमाने, प्रा. डॉ. जे. ए. पाटील, प्रा. दत्तात्रय खळदकर, प्रा. सुभाष चवरे, प्रा. रमेश लाड, प्रा. अमर लाड, प्रा. वैष्णवी जंगम, प्रा. शिंदे, प्रा. सौ. वंदना लोंढे, प्रा. नवनाथ गुंड, प्रा. विवेकानंद माने आदी उपस्थित होते.

दै. सकाळ
दि. 30/07/2023

# कुंडल महाविद्यालयामध्ये मणिपूर अत्याचारप्रकरणी 'एक सही संतापाची'

केसरी वृत्तसेवा

**कुंडल :** मणिपूरमधील घटनेच्या निषेधार्थ क्रांतिअग्रणी डॉ. जी. डी. बापू लाड महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना व राष्ट्रवादी विद्यार्थी संघटना, पलूस तालुका, प्रतिनीधी ज्युनियर कालेज यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक सही संतापाची' हा उपक्रम राबवण्यात आला.

मणिपूर येथे झालेल्या महिलांवरील अत्याचाराला जबाबदार कोण? हा प्रश्न आज देशातील स्त्रीला पडला असतानाच असे अत्याचार थांबवायचे असतील तर पुन्हा एकदा क्रांतिसिंह नाना पाटील यांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यपूर्व काळात स्थापन झालेल्या पत्रीसरकारची देशाला गरज असल्याची भावना महिला, विद्यार्थिनीसह जनतेतुन व्यक्त होत आहे. यावेळी प्रा. सर्जेराव खरात डॉ. धनंजय होनमाने यांनीही या घटनेवर मत व्यक्त करून निषेध व्यक्त केला.

याप्रसंगी गांधी एज्युकेशन सोसायटीचे पलूस तालुका राष्ट्रवादी विद्यार्थी संघटनेचे अध्यक्ष संदिप मुळीक, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. एस. डुबल, प्रतिनिधी विद्यासंकूलाचे मुख्याध्यापक चंद्रकांत जाधव, डॉ. जे. ए. पाटील, डॉ. दत्तात्रय खळदकर, डॉ. सुभाष चवरे, प्रा. रमेश लाड आदीसह प्रतिनिधी विद्यासंकूलासह महाविद्यालयातील विद्यार्थिनी, प्राध्यापक उपस्थित होते.




**कुंडल : मणिपूरमध्ये महिलांवर झालेल्या अत्याचारप्रकरणी कुंडल महाविद्यालयात एक सही संतापाची हा उपक्रम राबविला.**

दै. केसरी

दि. 30/08/2023